
स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड

RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com

https://www.beedvastav.com


■ बीड / प्रतिनिधी

1994 ते 2022 पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी परिस्थिती होती, तिच परिस्थिती राहील . त्यानुसार लोकल बॉडीचे इलेक्शन घेतले जातील, असे आदेशच कोटार्ने दिले आहेत . त्यामुळे ओबीसींना मोठा दिलासा मिळाला आहे . दरम्यान बीड जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणुकीत जे घडले तेच विधानसभेत पहावयास मिळाले . थोडक्यात सांगावयाचे झाले तर ओबीसी फॅक्टर चालला असे म्हणायला काहीच हरकत नाही . आता येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये देखील ओबीसी फॅक्टर नुसता चालणार नाही तर तुफान चालणार अशी आजची एकंदरीत परिस्थिती आहे . विशेष म्हणजे जातीय ध्रुवीकरणाचा विचार केला तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अनेक दिग्गजांना तोंडावर पडावे लागणार आहे . अनेक ठिकाणी जे निकाल लागतील ते अनपेक्षित असतील , असे जाणकारांचे मत आहे . तेव्हा निवडणुकीच्या अगोदर असलेली भाषा आणि निवडणुका जवळ आल्या की सारवासारव करणारी भाषा बोलणारे तोंडावर पडल्याशिवाय राहणार नाहीत, असेही काही जाणकारांनी बोलून दाखविले आहे .



## बीड जिल्ह्यात ओबीसींची मोठी ताकद !

■ बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज विविध पक्षांमध्ये विखुरला गेला होता . मात्र, लोकसभा निवडणुकीच्या वेळी जे जातीय ध्रुवीकरण झाले तेव्हापासून ओबीसी समाज एकत्र आला, हे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत प्रकषार्ने जाणवले . विशेष म्हणजे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ओबीसींच्या डोक्यावरून खूप पाणी गेले . त्यामुळे आता येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ओबीसी बांधव आपली ताकद दाखविण्यासाठी सज्ज झाला आहे . लोकसभा आणि विधानसभेमध्ये आपणही कुठे कमी नाहीत याची जाणीव झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत याचे चांगले परिणाम ओबीसींना दिसून येणार आहेत, अशा भावना नाव न छापण्याच्या अटीवर काही ओबीसी बांधवांनी बोलून दाखविल्या आहेत .

| वर्ष | बीड जिल्हा | अंदाजित लोकसंख्या |
|---|---|---|
| २०११ | २,५८५,०४९ | २५.८५ लाख |
| २०२१ | ३,०१०,००० | ३०.१६ लाख |
| २०२२ | ३,०५०,००० | ३०.५९ लाख |
| २०२३ | ३,०९०,००० | ३०.९५ लाख |
| २०२४ | ३,१२०,००० | ३१.२७ लाख |
| २०२५ | ३,१५०,००० | ३१.५४ लाख |

**ओबीसीच्या धक्का तंत्राने अनेक दिग्गजांना बीड जिल्ह्यात बसणार फटका !**

## ओबीसींसाठी मोठा दिलासा !

■ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कधी होणार ? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं होतं . मात्र आता हा तिढा सुटला आहे . सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत . त्यामुळे राज्यात सप्टेंबरमध्ये निवडणुका होणार आहेत . तसेच ओबीसी आरक्षणाबाबतही सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे आदेश दिले आहेत . ओबीसींच्या जागा कमी न करता या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत . ओबीसींचे राजकीय आरक्षण कमी न करण्याचे आदेशच सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत . त्यामुळे ओबीसींसाठी मोठा दिलासा मिळाला आहे .

# यावेळी बीड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ओबीसी फॅक्टर तुफान चालणार!!

निवडणुकीच्या अगोदर एक अन् निवडणुका लागल्या की सारवासारवची भाषा बोलणारे तोंडावर पडणार!! ◆ बीड लोकसभा, विधानसभेत जे घडलं तेच आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत घडणार ! ◆ जातीय ध्रुवीकरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही अनपेक्षित निकाल लागणार !



बीड जिल्हा धर्म डेटा बोली करा

| वर्णन | टक्केवारी | लोकसंख्या २०११ |
|---|---|---|
| हिंदू | ८४.१२ | २,१७४,६७२ |
| मुस्लिम | १२.३९ | ३,२०,३९५ |
| ख्रिश्चन | ०.०८ | २,०९७ |
| शीख | ०.०३ | ८२४ |
| बौद्ध | २.६५ | ६८,४८२ |
| जैन | ०.३४ | ८,७१९ |
| इतर | ०.०२ | ३९९ |
| सांगितलेले नाही | ०.३७ | ९,४६१ |

## गेवराईमध्येही ओबीसी फॅक्टरच चालणार : बलभीम बारगजे, राजेंद्र हराळे



■ 2024 च्या लोकसभा निवडणुकीत जो प्रकार गेवराई मतदार संघामध्ये ओबीसी मुद्दयावर झाला . तीच परिस्थिती विधानसभेच्या निवडणुकीत दिसून आली . त्यामध्ये सर्व ओबीसी उमेदवारांना मिळून एकूण 40,000 हजारहून अधिक मतदान पडले . हे गेवराई तालुक्यातील ओबीसींच्या जागृतीचे प्रतीक म्हणावे लागेल . स्थानिक, सामाजिक परिस्थिती व तालुक्यात असणारी 2 लाखाहून अधिक ओबीसींची संख्या या सर्वांमध्ये आता राजकीय प्रतिनिधित्वासाठी स्पर्धा सुरू झालेली आहे . गावगाड्यातील तरुण देखील नगरपालिका, पंचायसमिती, जिल्हा परिषद आणि नुकत्याच लागलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत मूळ ओबिसीवर अन्याय होतो की काय ? अशी चर्चा तालुक्यात आहे . 2 दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या गट, गण रचनेतील गावांचे स्वरूप पाहिले असता एकूण 9 जिल्हा परिषद गटांपैकी 4 ते 5 गटांमध्ये ओबीसीचा प्रभाव अधिक असल्याचे दिसून येते . त्यामुळे साहजिकच जिल्हा परिषद सदस्य सहज होऊ शकतात अशी आजची परिस्थिती आहे . जो पक्ष जास्त ओबीसीला प्रतिनिधित्व देईल त्यांच्याकडेच हा ओबीसी मतदार झुकणार आहे . स्वातंत्र्यानंतर मागील 65 वर्षात गेवराई तालुक्यात आजपर्यंत ओबीसीना पाहिजे त्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व मिळालेले नाही . ही कसर यावेळी भरून काढण्याची भावना ओबीसी मतदारांमध्ये आहे . म्हणून यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये याची तीव्र प्रतिक्रिया उमटणार असून ही सुप्त लाट तालुक्यात प्रकषार्ने पहावयास मिळणार आहे .

# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे काम बंद आंदोलन सुरू

**मागण्या मान्य न झाल्यास उद्यापासून बेमुदत संपावर जाणार !**

■ अंबाजोगाई / प्रतिनिधी

महाराष्ट्रात राज्य परिचारिका संघटनेने विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. यामध्ये प्रामुख्याने सातव्या वेतन आयोगानुसार वेतनातील असमानता आणि कंत्राटी परिचारिका भरतीला विरोध करणे, तसेच इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे.

राज्यातील परिचारिकांच्या बाह्य स्त्रोताद्वारे पदभरती व इतर संवेदनशील प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर, संघटनेने आपल्या सर्व शाखासह राज्यव्यापी आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा



अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील परिचारिका आपल्या सर्व सभासदासह सहभागी झाल्या आहेत.दि. १५ व १६ जुलै २०२२५ धरणे आंदोलन व निदर्शने आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आले होते. त्यामुळे दि.१७ जुलै २०२५ रोजी एक दिवस काम बंद आंदोलन करण्यात येत आहे. काम आंदोलनाची दखल न घेतल्यास दि १८ जुलै २०२५ पासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.या वेळी संघटनेचे अध्यक्ष आशा यादव, सचिव कृष्णा शिंदे, मीरा जाधव,उषा राठोड,रजिया शेख,छाया सानप,स्वप्निल गाडे,समीर सय्यद,दत्ता गवळी, रोशनी भालेराव,वसंत राऊत, खेलबा सोनटक्केसंघमित्रा ताटे, वर्षा सौताडेकर, आशा भोसले, माधवी भोसले,सल्लागार दादासाहेब घोळवे, विश्रांती पवार, मेघा गुणाल, स्वप्ना आगाव, उषा गोचडे, अलका मेहकर.सह शेकडो परिचारिका उपस्थित होत्या.

### आंदोलनाची दिशा

■ आज संघटना व सरकारसोबत चर्चा करण्यात येणार असून यावेळी त्यांनी मागण्या मान्य केल्या नाहीत तर उद्यापासून बेमुदत संपावर जाणार आहोत .

**– आशा यादव, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा अंबाजोगाई**

# हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक सुलेमान बाबा यांचा आज ऊर्स

■ आष्टी / प्रतिनिधी

तालुक्यातील सुलेमान देवळा येथील ग्रामदैवत हजरत सुलेमान बाबा यांचा उरूस आज गुरुवार रोजी साजरा होत आहे. सुलेमान बाबा यांचा ऊर्स म्हणजे यात्रा आषाढ महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी असते परंतु लक्ष्मी आईची यात्रा तिसऱ्या मंगळवारी झाल्या शिवाय बाबांची यात्रा होत नाही.म्हणून यंदा चौथ्या गुरुवारी ही यात्रा साजरी होत आहे.

ही यात्रा गावातील तसेच बाहेरील सर्व जाती धमार्तील लोकं मोठ्या उत्साहात साजरी करतात.यावेळी बाहेरूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.सकाळी गावातून मिरवणूक काढली जाते.त्यानंतर डोंगरावर असलेल्या दर्ग्यावर चादर अर्पण केली जाते.त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येते.त्यानंतर संध्याकाळी छबीना मिरवणूक



काढली जाते.यामध्ये गावातील सर्व जाती धमार्तील लोकं तरुण मोठ्या संख्येने उपस्थित असतात. सामाजिक धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे सिध्दार्थ भानुदास भादवे यांनी स्वखचार्ने दर्गा परिसरात पत्र्याच्या शेडच काम केले असून त्यांच्या या कायार्मुळे सामाजिक एकतेचा चांगला संदेश गेला आहे.

**ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य मिरवणूकीने लक्ष वेधल**

# अंबाजोगाईत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

■ अंबाजोगाई : प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक





पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प. किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बदार्पूरकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मूंदगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर,अंबाजोगाई) हे होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले. या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बदार्पूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रकाश बलुतकर, लक्ष्मण पाथरकर, मधुकर जिरे, नामदेव माळी, दत्तात्रय घोडके, रमेश जिरे, बबन घोडके, दशरथ जिरे, बालासाहेब मसने, अशोक बलुतकर, बालासाहेब माळी, प्रदीप जिरे, विष्णु राऊत, सुभाष चोपणे, डॉ.सुरेश अरसुडे, डॉ.दिपक फुटाणे, बालासाहेब चोपणे, विठ्ठल शिंदे, रमेश घोडके, सिद्राम घोडके, मधुकर घोडके, अशोक जिरे, तुषार करपुडे, बालासाहेब घोडके, संतोष जिरे, गोविंद पाथरकर, पवन जिरे, योगेश डाके, महेश सपाटे, आशिष आढाव, अभिजीत जिरे, शरद माळी, तुकाराम माळी, मंगेश बलुतकर, नितीन जिरे, दिपक गिरे, बबनराव जाधव, पंकज राऊत यांनी तसेच संयोजक, समस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.

# शाब्बास शुभांशू!

'ॲक्सिअम - ४' मोहिमेतलं अंतराळवीरांना परत पृथ्वीवर घेऊन येणारं 'ग्रेस यान' मंगळवारी दुपारी तीन वाजून एक मिनिटांनी प्रशांत महासागरातल्या अमेरिकेच्या सेंट दियागो किनाऱ्यालगत पाण्यात अलगद उतरलं, तेव्हा भारताने आपल्या अंतराळ विज्ञानाच्या प्रगतीतला खूप महत्त्वाचा टप्पा पार केला. 'ॲक्सिअम-४' अंतराळ मोहिमेत सहभागी झालेल्या ४ अंतराळवीरांपैकी केवळ एक, शुभांशू शुक्ला भारतीय असला, तरी भारताच्या आगामी 'गगनयान' या अत्यंत महत्त्वाकांक्षी, स्वदेशी मोहिमेची मुहूर्तमेढ शुभांशूच्या या यशस्वी अंतराळफेरीने रोवली, हे महत्त्वाचं आहे. शुभांशूआधी भारताचा राकेश शर्मा हा अंतराळवीरही अंतराळात जाऊन सुखरूप परतला आहे. पण, त्याचा अंतराळ काळ कमी दिवसांचा होता आणि ती मोहीम मुख्यतः रशियाचीच होती. रशियाच्या 'सॅल्यूट - ७' या अंतराळ तळावर आठ दिवस राहून राकेश शर्मा परत आला, त्याला चाळीस वर्षे झाली. राकेश शर्माचा आदर्श समोर ठेवून सुधांशू शुक्ला अंतराळात गेला. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रात पाऊल ठेवणारा तो पहिला भारतीय ठरला. पृथ्वीच्या कक्षेबाहेर २० दिवस राहून सुखरूप परतणाराही तोच पहिला भारतीय ठरला. भारताच्यादृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रयोग त्याने केले. त्या प्रयोगांनी संबंधित क्षेत्रात नवी दिशा सापडेल आणि समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी त्यातून जी रहस्य उघडतील, त्याचं प्राथमिक श्रेयही सुधांशूलाच द्यावं लागेल! शुभांशूचं सुरू असलेलं कौतुक, त्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, जिद्द आपल्या उगवत्या पिढीपुढे ठेवली, तर त्यातून आणखी अनेक अंतराळवीर तयार होतील आणि ते भारताचे नाव अवघ्या



विश्वात उंचावतील, यात शंका नाही.

'ॲक्सिअम - ४' ही मोहीम खरंतर गेल्या वर्षीच्या सुरुवातीलाच फत्ते व्हायची होती. पण, वातावरणाच्या अनेक अडचणी येत गेल्या. नवी तारीख जाहीर व्हायची, संपूर्ण तयारी केली जायची; पण हवामान आणि पृथ्वीच्या कक्षेच्या सीमारेषेवरील वातावरण दरवेळी काहीतरी नवी अडचण उभी करत असे. अखेरीस २६ जूनचा मुहूर्त कामी आला. त्या दिवशी अंतराळवीरांना घेऊन जाणाऱ्या यानासह अग्निबाणाने पृथ्वीची कक्षा ओलांडली. यानाने आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ मुक्कामात पृथ्वीभोवती तब्बल २८८ प्रदक्षिणा घातल्या, ७६ लाख मैलांचा प्रवास केला. ४३३ तासांच्या या अथक प्रवासादरम्यान सर्व शास्त्रज्ञांनी मिळून एकूण ६० संशोधनपर प्रयोग केले. शुभांशूने केलेल्या प्रयोगांमुळे भारतातल्या स्टेम सेलसंबंधातील संशोधनाला गती मिळेल, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. भारत आज अंतराळ संशोधनात अग्रेसर नाही, हे खरं. पण, त्या यादीत पहिल्या पाचांत आहे, हेही खरं. या क्षेत्रातील अतिप्रगत देशांच्या पंक्तीत मानाचं स्थान मिळवण्यासाठी भारताला अजून वेळ आहे. नियोजित 'गगनयान योजने'ने या क्षेत्रात आणखी काही पावलं पडतील, असं मानायला मात्र जागा आहे. 'ॲक्सिअम- ४' योजनेतला शुभांशूचा सहभाग, 'नासा'च्या अमेरिकेतल्या संशोधन केंद्रात तब्बल आठ महिने शिकण्याची मिळालेली संधी, अंतराळ प्रवासाचा आणि रहिवासाचा अनुभव - हे सगळंच 'गगनयान'साठी पायाभरणी ठरणार आहे. ही पायाभरणी अगदी भक्कम झाली, असं 'इस्रो'तील तज्ज्ञांचं मत झालं आहे. 'ॲक्सिअम-४'मधील तीच भारताची मोठी कमाई आहे.

'गगनयान योजने'साठी संपूर्ण भारतीय बनावटीच्या एचएलव्हीएम-३ या अग्निबाणाची उभारणी जवळजवळ पूर्ण झाली आहे. गगनयान अंतराळ यानाची उभारणीही अंतिम टप्प्यात आहे. या मोहिमेसाठी ज्यांची निवड झाली आहे, त्या प्रशांत नायक, अजित कृष्णन् आणि अंगद प्रताप यांना भारत आणि रशियाच्या अंतराळ संशोधन संस्थांकडून प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्याबाबतचं वेळापत्रकही तयार आहे. २०२८ मध्ये नियोजनानुसार गगनयान मोहीम यशस्वी होईल, असा या क्षेत्रातल्या तमाम शास्त्रज्ञांचा दृढ विश्वास आहे. त्याला धोरणकर्त्यांनी बळ द्यायला हवं. विज्ञान तंत्रज्ञानातील संशोधनासाठी अमेरिका त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.५% निधी खर्च करते, तर चीन २.७% निधी खर्च करतो. दक्षिण कोरियासारखा छोटा देश संशोधन, विकासावर त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के निधी खर्च करतो. ब्राझीलही त्यासाठी १.२% निधी राखीव ठेवतो. भारताचा हा खर्च आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघा ०.७% टक्के आहे. म्हणजे, भारताने आपल्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी किमान एक टक्क्यांचं महत्त्वाकांक्षी(!) उद्दिष्ट ठेवायला हवं, असं म्हणावं लागेल. आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार, शिक्षण प्रसार, विविध क्षेत्रांत देशाची सुरू असलेली घोडदौड पाहता या बाबीवरही अत्यंत गांभीर्याने विचार व्हायला हवा. सध्या दिसत असलेली प्रगती शाश्वत असावी, असं वाटत असेल, तर संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाच्या स्वदेशी प्रगतीसाठी निधीची चांगली तरतूद होणं गरजेचं आहे. संशोधन आणि नवीनतम कल्पनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच एक लाख कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची घोषणा केली आहे. त्या निधीचा योग्य आणि कार्यक्षम वापर झाला, तर भारताची तरुणाई त्यात आपलं भरीव योगदान देईल यात शंका नाही.

# प्रभावी बालसाहित्य आणि बालक

आज मी काही पुस्तकांसाठी क्रॉसवर्डमध्ये फेरी मारत होते. तिथे एक लहान मुलगी आपल्या पायांच्या अंगठ्यांच्या अगदी टोकावर उभी राहून पुस्तकांच्या वरच्या कप्प्यावरून एक पुस्तक काढण्याचा प्रयत्न करत होती. मी बाजूलाच होते, म्हणून लगेच तिला ते पुस्तक काढून दिलं, पण माझ्या हातातून ते पुस्तक खाली पडलं आणि मी त्या पुस्तकाचं शीर्षक वाचलं. ती लहान मुलगी, ... शीर्षक असलेलं पुस्तक(शीर्षक लिहिणं टाळलं आहे) घेऊन बिलिंग काऊंटरकडे पळत गेली. आठ नऊ वर्षांचं हे कोवळं वय आणि तिचे निरागस स्मितहास्य याचा मेळ त्या पुस्तकांशी जमणार होता का, असा प्रश्न मनात आला. कारण या उत्तर बाल्यावस्थेतील मुलांचे तार्किक तर्क वाढणे, विज्ञान कल्पनेत जास्त रस वाढणे, स्पष्टीकरणात साधर्म्यांचा वापर करणे, समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचा विकास करणे, आकलन शक्ती आणि निरीक्षण शक्ती उत्कट होणे ही वैशिष्ट्ये असतात.

स्मृती आणि कल्पनाशक्तीची स्वतःची शक्ती वापरण्याची क्षमता, या वैशिष्ट्यांचा अभ्यास करता या वयातील बालकांना तशा सकारात्मक संधी उपलब्ध करून देणं गरजेचं आहे हे आपल्या लक्षात येतेय. आकलनशक्ती उत्तम होत जाण्याच्या वयात आपण आयुष्य जगण्याची काही विशिष्ट तत्त्व असावी आणि ती कोणती असावी याबाबत बालकांचे मार्गदर्शन त्यांच्या आवडीच्या पद्धतीने करू शकतो. मग माझी पण उत्सुकता वाढली ते पुस्तक चाळून बघण्याची. मी पण त्या वरच्या कप्प्यातून ते पुस्तक काढलं. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरचे रक्ताचे डाग अगदी खरे वाटावे म्हणून भडक लाल रंग वापरला होता. त्यावर काळ्या रंगाच्या उभ्या पसरट मानवी आकृत्या होत्या. पुस्तक उघडून थोडी प्रस्तावना वाचली, तर लक्षात आलं एक मानसिक रोगी असलेल्या माणसाची ती कहाणी होती. ज्याने सात महिलांची अत्यंत क्रूरतेने कत्तल केली होती. हे पुस्तक या लहान बालिकेला का वाचावेसे वाटले असणार ?

डॉ. विजयाताई वाड यांनी लिहिलेली प्रायश्चित नावाची एक बालकथा आठवली. या कथेमध्ये गुरुनाथ नावाच्या एका बालकाची कथा आहे. त्यात किती सहजतेने चोरी करणं, हे किती चुकीचे आहे हे समजावून सांगितले आहे. या कथेत मोठ्यांनी समजूत काढल्यानंतर चुकीचे प्रायश्चित करून पुढे सकारात्मक मार्ग कसा निवडला हे सांगितलं आहे. ही कथा अत्यंत बालसुलभ भाषेत लिहिलेली आहे आणि सहजतेने जीवन शिक्षण देण्याचा उद्देश पूर्ण केला आहे. ती कथा बालकांनी




वाचणं खूप आवश्यक आहे. अशी पुस्तके या बालिकेच्या हातात असायला हवी, असं कळकळीने वाटून गेलं. पण खालच्या कप्प्यातील तिच्या वयासाठी उपलब्ध पुस्तकं तिने बघितलीदेखील नाही. वयाआधी उगाचच आलेलं हे मोठेपण कोणाची देणगी आहे? पालकांच्या अवास्तव अपेक्षादेखील याचं कारण असू शकते. कारण बिलिंग काऊंटरवर उभे असलेले तिचे बाबा अतिशय अभिमानाने सांगत होते की, माझी मुलगी खूप मॅच्युअर आहे. हे अकाली आलेलं प्रौढत्व बालपण होरपळून काढणारं असतं याचा विचार पालकांनी करायलाच हवा.

डॉ. राणी खेडीकर
अध्यक्ष, बाल कल्याण समिती-पुणे

बालकांसाठी असलेलं साहित्य आणि बालकांनी निर्माण केलेलं बालसाहित्य याची अशी कितीशी जमापुंजी आता उपलब्ध आहे? अशावेळी मोजक्या दर्जेदार साहित्यिकांची नाव आपल्या समोर येतात. त्यात प्रामुख्याने डॉ. विजयाताई वाड यांचा उल्लेख करणं आवश्यक आहे. खूप मोठा बाल साहित्याचा ठेवा त्यांनी बालकांना सुपूर्द केला आहे. आज बालके किती प्रमाणात वाचन करतात हा प्रश्न तर महत्त्वाच आहेच, पण काय दर्जाचे साहित्य वाचतात हा गंभीर विषय आहे. बालकांनी त्यांच्यासाठी असलेलं साहित्य वाचावं यासाठी शिक्षक, पालक यांचा आग्रह असतो पण बालकांना ते वाचण्यात किती रुची असते हा अभ्यासाचा विषय आहे. आज आपल्याला फक्त बालकांसाठी लिहिण्यात आलेली गाणी, गोष्टीची पुस्तके फारशी बघायला मिळत नाही. बालकांना वाचनाची त्यांच्यासाठी असलेल्या साहित्य वाचनाची गोडी निर्माण करणं अत्यावश्यक आहे. वाचन केल्याने बालकांचा दृष्टिकोन व्यापक होईल आणि लक्ष विचलित होणं कमी होऊन त्यांच्या बालमनाला पोषक आहार मिळेल. त्या-त्या वयाला त्या-त्या वयाचं कुतूहल असतं, ते शमवण्याचा प्रयत्न बालक आपआपल्या परीने करत असतात. त्यात त्यांना मदत करण्यास आम्ही सगळ्यांनी सोबत असायला हवं.

बालकांना आपली तत्त्व, आपले विचार याची बैठक बसवण्याच्या प्रक्रियेत काय योग्य-अयोग्य, विशिष्ट परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रगल्भता, ही एकाएकी येत नाही. त्या विशेष टप्प्यांची माहिती देण्याची जबाबदारी आपली आहे. उत्तर बाल्यावस्थेत आकलनशक्ती कमालीची वाढत असते. बालक त्यांनी कळलेली एखादी गोष्ट समजावून सांगण्यात खूप उत्सुक असतात. आकलन म्हणजे वाचलेला मजकूर समजून घेऊन, विश्लेषण करून त्यावर स्वतःच्या विचारांद्वारा इतरांना व स्वतःलाच सोप्या भाषेत समजावून देता येणे. याचा उपयोग करून अनेक छान विचारांनी प्रेरित करणारी पुस्तके बालकांना वाचायला देऊन त्याबाबत बालकाशी चर्चा करणं आणि त्यांची वाचनाबाबत आवड वाढवत जाणं आवश्यक आहे. मग माहिती केवळ उपदेशाने दिली गेली, तर बालक त्यांचा अवलंब करणार नाहीत, उलट ते वैतागतील. विविध प्रभावी माध्यमांचा उपयोग करावा लागणार त्यामध्ये बाल साहित्याची महत्त्वाची भूमिका आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबईत पहिले राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलन संपन्न झाले. त्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. संमेलनात बालकाच्या प्रश्नांवर लिखाण करण्यासाठी आणि बालकांचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी मला सन्मानित करण्यात आलं. संमेलनात सामील काही बालकांनी लिहिलेल्या गोष्टी आणि कवितांची पुस्तके प्रकाशित झाली. बालकांनी स्वरचित कविता सादर केल्या. एका बालिकेने 'उंच आकाशी उडावे' अशा शीर्षकाची कविता प्रस्तुत केली. तिच्या बालभावना या कवितेतून व्यक्त झाल्या. तिची स्वप्न ती सुरेख शब्दात मांडू शकली, अशी संधी बालकांना उपलब्ध करून द्यायला हवी.

नित्य नियमाने अभ्यास व्यतिरिक्त दर्जेदार आणि बालकांसाठी उपलब्ध साहित्याचे वाचन करण्याची सवय बालकांमध्ये निर्माण होण्यास आपण प्रयत्न करूया. केवळ वाचन नव्हे तर बालकांना लिखाण करण्यास प्रोत्साहित करूया. व्यक्त होण्याचं हे एक प्रभावी माध्यम निश्चितच आहे. आपल्या सकारात्मक प्रयत्नांनी बालकांना योग्य दिशा मिळू शकेल, यात शंका नाहीच.

# हिंदवी स्वराज्याचे साक्षीदार विश्वव्यापी...!



माझे कोकण

संतोष वायंगणकर

मराठी मनाला आनंद वाटेल अशी घटना मागील आठवड्यात घडली. महाराष्ट्राला अभिमान वाटणारी ही घटना आहे. महाराष्ट्राची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या महाराष्ट्रातील ११ गडकिल्ल्यांचा जागतिक वारसास्थळामध्ये समावेश झाला. छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातली स्थापत्य कला जागतिक स्तरावर पोहोचली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि पराक्रमाचे खऱ्या अर्थाने जिवंत साक्षीदार असणारे हे गडकिल्ले जागतिक स्तरावर पोहोचले आहेत. महाराष्ट्रातील हे गडकिल्ले महाराष्ट्रातील जनतेला माहिती होतेच; परंतु त्याला आता युनेस्कोमध्ये स्थान मिळाल्यामुळे विश्वव्यापी झाले आहेत. आज या गडकिल्ल्यांवर हजारो पर्यटक येत असतात. मराठा साम्राज्याच्या शौर्याची साक्ष असणारे हे गडकिल्ले एकाचवेळी युनेस्कोच्या नकाशावर यावेत हे खरं तर मराठी मनाला सुखद अशी घटना आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्गाबरोबरच अन्य किल्ल्यांचा समावेश आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी, लोहगड, साल्वेर, सुवर्णदुर्ग, खांदेरी, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग तामिळनाडुतील जींजी या प्रत्येक किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक गडकिल्ला छत्रपती शिवरायांच्या व्यवस्थापनाचा स्थापत्य वैशिष्ट्यासह बांधण्यात आला आहे. सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे किल्ले तर समुद्रातच उभे आहेत. विजयदुर्ग किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आरमारी तळ म्हणून ओळखला जायचा. आजवर या गडकिल्ल्यांची बरीच पडझडही झाली. पुरातत्त्व विभागाच्या सुधारणांना फारच मर्यादा होत्या. आता युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात या गडकिल्ल्यांचा समावेश झाल्याने साहजिकच राज्य आणि केंद्र सरकारकडून देखभाल दुरुस्तीसाठी खर्च केला जाऊ शकतो. जागतिक स्तरांच्या वारसास्थळांची जपणूकही होऊ शकते. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारने महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि मराठा साम्राजाचा इतिहास जगासमोर युनेस्कोच्या माध्यमातून केला आहे.

कोकणात गेल्या काही वर्षांत पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत. कोकणातील निसर्ग, स्वच्छ सुंदर आणि आकर्षण ठरणारे समुद्र किनारे यामुळे साहजिकच पर्यटकांचा ओघ वाढला आहे; परंतु युनेस्कोच्या रेकॉर्डनंतर जागतिक स्तरातील पर्यटकांचा ओघ भविष्यात मोठा वाढणार आहे. मराठा साम्राज्याच्या पराक्रमाचा इतिहास देशपातळीवरही माहीत होता. आता इतिहासाची, पराक्रमाची पानं जागतिक स्तरांवर उलगडली जात आहेत. एकीकडे मराठ्यांच्या युद्धनीतीवर प्रकाश पडेल. कोकणातील ही वारसास्थळ या पुढच्या काळात केवळ पर्यटन स्थळ असणार नाहीत, तर सर्वांगाने जागतिक स्तरावरचा येणारा पर्यटक त्यांच्या-त्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करत राहिल. यातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचा पराक्रम, त्यांच्या शौर्यगाथा नव्याने जगासमोर मांडल्या जातील. त्याचा निश्चितपणे फायदा कोकणातील पर्यटन वाढीला होऊ शकेल. आजवर केवळ इतिहासप्रेमी, इतिहास अभ्यासकच या गडकिल्ल्यांच्या भेटीला जात होते; परंतु यापुढच्या काळात सर्वच पर्यटक या जागतिक वारसास्थळांना भेटी देतील. आता या जागतिक वारसा यादीत जरी भारताचं आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व अधोरेखित झाले असले तरीही भविष्यात या युनेस्कोच्या यादीतील वारसास्थळं त्याच पद्धतीने जपली पाहिजेत.

यापुढे येणाऱ्या पर्यटकांना आणि स्थायिक असणाऱ्या सर्वांनाच स्वतःला काही शिस्त अंगीकारणे आवश्यक आहे. बऱ्याच पर्यटनस्थळांवर रिकाम्या पाण्याच्या बाटल्या अशाच फेकल्या जातात. समुद्र किनाऱ्यांवर जेव्हा साफसफाई केली जाते तेव्हा तर ढीगभर कचरा, रिकाम्या बाटल्या सापडतात. आपण एक बाटली फेकली म्हणून काय फरक पडतो असा काहीसा गैरसमज करून घेऊन परिसर अस्वच्छ करण्यात हातभार लावला जातो. कोणी सांगून, बोलून शिस्त लागत नाही. प्रत्येकाने ठरवूनच ती पाळावी लागेल. आज युनेस्कोच्या यादीत आपल्या महाराष्ट्रातील, कोकणातील वारसास्थळांचा समावेश होणं ही घटना कोकणच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करण्याजोगी आहे. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या किल्ल्यांचा समावेश असणं कोकणच्या पर्यटन विकासात किती भर घालणार आहे, याचा विचारही कोकणवासीयांना करता येणार नाही. यापुढे कोकणात येणारा पर्यटक हा जगभरातून येणारा असेल. या आंतरराष्ट्रीय पर्यटकाला आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपली आहे. यानिमित्ताने येणारा पर्यटक कोकणातच थांबला पाहिजे, राहिला पाहिजे. जगातून येणारा पर्यटक या पर्यटनस्थळांवर येऊन पैसे खर्च करण्याच्या मानसिकतेत असेल; परंतु येणाऱ्या पर्यटकांची मानसिकता जाणून त्याप्रमाणे त्यांना आनंदी वातावरण निर्माण करणे आणि पर्यटक आनंदी कसा राहील हे पाहण्याची जबाबदारी आपलीच असणार आहे.

अनेक संस्था, व्यक्ती, केंद्र, राज्य सरकार या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे मोठे फलित आहे. कोकणातील ही वारसास्थळे पर्यटकांचा मोठा ओघ वाढवणारी आहेत. कोकणासाठी भाग्याची ही बाब आहे. महाराष्ट्राला जशी ती अभिमानास्पद आहे त्याचप्रमाणे कोकणालाही ही बाब मान उंचावणारी आहे. आपणाकडे वारसा जतन केलेला होताच यानिमित्ताने तो जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाला आहे. युनेस्कोने त्यावर मोहोर उठवली. युनेस्कोच्या यादीत वारसास्थळांचा समावेश झाला हे आपण जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथा आणि छत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष ठरणारे हे गडकिल्ले विश्वव्यापी झाले आहेत. आपल्या महाराजांच्या पराक्रमांच्या यशोगाथा ऐकताना निश्चितपणाने अंगावर रोमांच उभे राहतात. आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन, दूरदृष्टी प्रत्येक बाबतीतले बारकावे या सर्वांबद्दलची माहिती आता या पुढच्या काळात जगाच्या केवळ नकाशावर असणार असे नाही, तर त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चाही जागतिक स्तरावर होतील. छत्रपतींच्या या इतिहासाच्या कथा जगाला प्रेरणा देत राहतील. यामुळेच कोकणासाठी ही फार मोठी बाब आहे.

## राशिभविष्य
गुरुवार, १७ जुलै २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती आषाढ कृष्ण सप्तमी शके १९४७, चंद्र नक्षत्र रेवती, योग अतिगंड, चंद्र राशी मीन, भारतीय सौर २६ शके १९४७, गुरुवार दिनांक १७ जुलै २०२५, मुंबईचा सूर्योदय ०६.९, मुंबईचा सूर्यास्त ७.१९, मुंबईचा चंद्रोदय ११.५६, मुंबईचा चंद्रास्त ११.५८ राहू काळ ०२.२३ ते ४.१., कालाष्टमी, करी दिन.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : ग्रहांचे भ्रमण क्रियाशील ठेवणार आहे.

**वृषभ** : यशाकडे वाटचाल करणार आहात.

**मिथुन** : नोकरीमध्ये सुवार्ता कळतील

**कर्क** : वादविवादाचे प्रसंग टाळलेलेच बरे.

**सिंह** : जोडीदाराचे विशेष सहकार्य लाभेल.

**कन्या** : नोकरीमध्ये मानसिकता द्विधा असेल.

**तूळ** : प्रावीण्य आपणास सुखावून जाईल.

**वृश्चिक** : घरातील वातावरण आनंदी असेल.

**धनू** : प्रयत्न यशस्वी होतील.

**मकर** : दिवस समाधानकारक असणार आहे.

**कुंभ** : आपले कामांमध्ये सातत्य राहणार आहे

**मीन** : कामात जास्त लक्ष घालावे .

## जनसंवाद

### महत्वाचे पाऊल ?

ॲक्सिअम-४ या अंतराळ मोहिमेंतर्गत भारताचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात गेलेले चार अंतराळवीर सुखरूप पृथ्वीवर परतले. भविष्यातील भारताच्या 'गगनयान' मोहिमांच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ॲक्सिअम मोहिमेवर झालेल्या खर्चापैकी ५५० कोटी रुपयांचा भार इस्रोनी उचलून मानवी अंतराळ मोहिमेच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल टाकले आहे. भारत २०२७ मध्ये राबवणाऱ्या गगनयान मोहिमेला बळ मिळणार आहे. ड्रॅगन अंतराळयान महत्त्वपूर्ण संशोधन साहित्य घेऊन परतले आहे, ज्यामुळे या मोहिमेचे विज्ञानातील योगदान अधिक अधोरेखित होते. शुभांशू यांच्या या मोहिमेनंतर भारत आगामी काळात अंतराळ स्थानक स्थापन करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे शुभांशू यांचा हा अनुभव भारताच्या गगनयान मोहिमेत उपयुक्त ठरणार आहे. भारत सरकारने ॲक्सिअम-४ मोहिमेवर सुमारे ५४८ कोटी रुपये खर्च केले आहेत. अशा खर्चिक मोहिमा आपल्यासारख्या देशाला झेपणार आहेत का? ही मोहीम महत्त्वाचे पाऊल ठरत असले तरीही या मोहिमांचा देशाला काय उपयोग होणार आहे?

**- विवेक तवटे,** कळवा

### 'टेस्ला'ने वाहन उद्योगाला उभारी मिळणार?

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून नुकताच मुंबईत टेस्ला एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन करण्यात आले आहे. जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कारनिर्माता टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला आहे. त्यामुळे हे सेंटर भारतीयांसाठी गेम चेंजर ठरणारं आहे. मुंबईतील टेस्लाचे सेंटर हे केवळ एक्सपीरियन्स सेंटर न राहता, डिलिव्हरी लोकेशन, लॉजिस्टिक सेंटर आणि सर्विसिंग युनिट देखील येथे सुरू करण्यात आले आहे. टेस्लाच्या कार्सचे बुकिंगही याठिकाणी सुरू झाले आहे. टेस्लाचे जगप्रसिद्ध मॉडेल 'Model Y' भारतात लाँच करण्यात आले असून, या कारला १५ मिनिटांत चार्ज करता येते आणि ती एकदा चार्ज केल्यानंतर ६०० किमी धावू शकते. ही कार शून्य प्रदूषण करणारी असून, तिचे सेफ्टी फीचर्स जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानले जातात, राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहने प्रोत्साहनासाठी अत्यंत डायनॅमिक पॉलिसी राबवली आहे. यामध्ये चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, कर सवलती व मॅन्युफॅक्चरिंगसाठी विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. येत्या काळात महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उद्योगात देशात आघाडीवर असेल. तसेच मुंबईनंतर भारतातील आणखी दोन शहरांमध्ये सेवा विस्तारित केली जाणार असून, मुंबईत चार मोठे चार्जिंग हब आणि ३२ चार्जिंग स्टेशन उभारली जाणार असल्याचे बोलले जात असले तरी इलेक्ट्रिक वाहन उद्योगासाठी अजून बऱ्याच प्राथमिक स्वरूपाच्या सेवा अर्थात मोठ्या प्रमाणात चार्जिंग केंद्रांची निर्मिती करणे यासह यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने विशेष प्रयत्न केले पाहिजेत तरंच या इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला उभारी मिळेल !

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगांव

### खेळाडूंचे प्रतीक महानगरपालिका क्रीडा भवन

मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन शंभराच्या उंबरठ्यावर आहे. १९२६ साली तत्कालीन महापालिका आयुक्तांनी लावलेल्या रोपट्याचा कल्पवृक्ष झाला आहे. क्रीडा भवनाचे सभासद हे मुंबई महापालिकेचे कर्मचारी, अधिकारी यांना होता येते. असे साधारण बारा हजारांहून अधिक सभासद आहेत. क्रीडा भवन स्वायत्त संस्था आहे. आर्थिक उलाढाल लाखो रुपयांची असून क्रीडा भवनाचे व्यवस्थापन खेळाडूंनी निवडणुकीत निवडून दिलेल्या उमेदवारांची कार्यकारिणी स्थापन होऊन मानद सचिवांमार्फत वेगवेगळ्या खेळांचे मानद सचिव निवडले जातात. मागील पंधरा वर्षांपासून क्रीडा भवनाचे कामकाज प्रशासकाच्या ताब्यात आहे. या कालावधीत ना सर्वसाधारण सभा झाल्या ना वार्षिक अर्थसंकल्पाचा ताळेबंद. खेळाडूंची मासिक फी, आजीव सभासद यांच्याकडून येणाऱ्या पैशांचा हिशोब सभासदांपुढे आणला गेला नाही. आता तर क्रीडा भवनाच्या जागेवर महापालिका प्रशासन नगर सभागृह, वाहनतळ, रुफ टॉप, काचेची कॅप्सूल लिफ्ट, व्ह्यूंग गॅलरी, कॅफेटेरिया आदी गोष्टी उभारणार असल्याचे वर्तमानपत्रातून समजले. मग, खेळाडूंच्या, सभासदाच्या पैशाचे काय? मुंबई महानगरपालिका खेळाडूंनी मुंबई महापालिकेचे नाव जगाच्या नकाशावर उमटवले आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भारताच्या विविध खेळात क्रीडा भवनाच्या खेळाडूंचा समावेश होतो. क्रीडा भवनाच्या शिवाजी पार्क येथील शाखेची जागा प्रशासनाने महापौर बंगल्यासाठी आरक्षण बदलले. त्या बदल्यात अजून क्रीडा भवनास पर्यायी जागा मिळालेली नाही. क्रीडा भवन कर्मचाऱ्यांची तेथे निवासस्थाने होती. त्यांच्याकडून २९ ऑगस्ट २०२२ रोजी रिकामी करून घेण्यात आली. महापालिका प्रशासनाने क्रीडा भवन खेळाडूंची निवडणूक घेऊन त्यांच्या ताब्यात देऊन क्रीडा भवनाचा शतक महोत्सव साजरा करावा.

**- महादेव गोळवसकर,** कुर्ला

### समोसा, जिलेबी : धोकादायक नाही

समोसा, वडापाव, जिलेबी, लाडू आणि मिठाई यांसारख्या अन्नपदार्थांवर उत्पादकांनी, विक्रेत्यांनी सिगारेटच्या पाकिटावर लिहिल्याप्रमाणे हे पदार्थ 'आरोग्यासाठी हानिकारक आहेत' असे आरोग्यविषयक इशाऱ्याचे वाक्य लिहावे, असा आदेश केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर एकच गहजब उडाला. अनेकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. विविध वृत्तवाहिन्यांवर लागलीच आहारतज्ज्ञ, हॉटेल मालक, समाजसेवक इत्यादींना बोलावून या विषयावर चर्चासत्रही झडली. त्यातून सरकारच्या या निर्णयाच्या आनुषंगाने संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. अन्नपदार्थांना तंबाखू आणि सिगारेटच्या रांगेत बसवणे हे अनेकांना खटकले. जिभेचे चोचले पुरवणारे वडापाव, समोसा, जिलेबी असे आपले आवडते पदार्थ 'आरोग्यास अपायकारक' आहेत असे कितीही म्हटले तरी खाणारे ते पदार्थ खाण्याचे सोडणार नाहीत, असाही एक मतप्रवाह समोर आला. ही चर्चा टिपेला पोहोचली असतानाच भारतीय प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने या बातमीचे खंडन केले असून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सिगारेटसारखा समोसा, जिलेबी आणि तत्सम अन्नपदार्थांसाठी असा कोणताही 'आरोग्य हानिकारक' इशारा दिला नसल्याचे म्हटले आहे. पीआयबीच्या खुलाशाने लोकांच्या मनातील संभ्रम दूर झाला आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### हा नवा प्रघात कशासाठी?

अधिवेशन काळात विधानसभेच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षांच्या आमदारांनी निदर्शने, आंदोलने करणे हे एकवेळ समजण्याजोगे आहे. सरकारविरुद्ध आवाज उठवण्यासाठी सभागृहाबाहेर दबाव निर्माण करण्याची ती त्यांची पद्धत असते; परंतु सध्या सत्ताधारी पक्षाचे आमदारही याच पायऱ्यांवर फलक घेऊन उभे राहतात, निदर्शने करतात, हे चित्र विचित्र वाटते. विरोधकांसमोर सरकारचा बचाव करताना सत्ताधाऱ्यांनी तर सभागृहातच ठाम भूमिका घ्यायला हवी. त्यांच्याकडे प्रशासनाची सूत्रे असताना, निर्णयक्षमता त्यांच्या हाती असताना, त्यांना फलकबाजी करण्याची गरज का भासावी? हा नवा प्रघात कशासाठी? विरोधी पक्षांवर कुरघोडी करण्यासाठी की वृत्तवाहिन्यांतून सातत्याने छबी झळकण्यासाठी? सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, या नव्या प्रघाताने शेवटी लोकशाहीचीच चेष्टा होते.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### शक्तिपीठ महामार्गाला विरोध नको

महाराष्ट्रात समृद्धी महामार्ग यशस्वीपणे राज्याच्या जनतेच्या सेवेत उपलब्ध करून दिल्यावर आता शक्तिपीठ महामार्ग कधीपर्यंत सेवेत येईल याची उत्सुकता महाराष्ट्रातील जनतेला लागली आहे. तरी त्याकरिता अजूनही पाच वर्षे जनतेला वाट पाहावी लागणार आहे. समृद्धी महामार्गाला देखील असाच विरोध झाला होता पण शासनाने प्रकल्प पूर्ण केलाच आणि विरोध करणाऱ्याच्या गाड्या देखील त्याच रस्त्याने आज दिमाखात जात आहेत. प्रकल्प म्हटला की विरोध हा येणारच, पण त्यामुळे विकासाचा ध्यास सोडता येणार नाही. तर विरोधक सभागृहात या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांची बाजू ठामपणे मांडत आहे. पण काहीही झाले तरी शासनाला शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला समर्थन करणाऱ्या शेतकऱ्यांची बाजू देखील पाहावी लागणार आहे. सहापदरी असलेला शक्तिपीठ महामार्ग बारा जिल्ह्यांमधून जात असून विविध नामांकित व प्राचीन तीर्थश्रेत्रांना जोडणार असल्याने मराठवाडा, विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्राला त्याचा विशेष फायदेशीर ठरणार आहे. पर्यायाने राज्याचा विकास होणार असल्यामुळे शक्तिपीठ महामार्गाला विरोध मुळीच नको, असे वाटते.

**- संजय साळगांवकर,** कुर्ला

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# कहाणी चातुर्मासाची !



मनाचा गाभारा
अर्चना सरोदे



हिंदू धर्मानुसार आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी या चार महिन्यांच्या काळास चातुर्मास असे म्हणतात. धर्मशास्त्रानुसार चातुर्मास आषाढ शुक्ल चतुर्दशीला सुरू होतो आणि कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतो. चातुर्मासाचे चार महिने म्हणजे आषाढाचे २० दिवस, श्रावण-भाद्रपद-आश्विन हे तीन पूर्ण महिने आणि कार्तिक महिन्याचे पहिले ११ दिवस. ज्या वर्षी श्रावण, भाद्रपद किंवा आश्विन महिन्यात अधिक मास येतो, त्यावर्षी चातुर्मास पाच महिन्यांचा असतो. मनुष्याचे एक वर्ष म्हणजे देवांची एक अहोरात्र असते. दक्षिणायन ही देवांची रात्र असून उत्तरायण हा त्यांचा दिवस असतो. कर्क संक्रांतीस उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनास प्रारंभ होतो, म्हणजेच देवांची रात्र चालू होते. कर्क संक्रांत आषाढ मासात येते, म्हणूनच आषाढ शुद्ध एकादशीस 'शयनी एकादशी' म्हटले आहे. कारण 'त्या दिवशी देव झोपी जातात', अशी समजूत आहे. कार्तिक शुद्ध एकादशीस देव झोप घेऊन उठतात, म्हणून तिला 'प्रबोधिनी एकादशी' असे म्हणतात. उत्तरायण आणि दक्षिणायन हे सहा सहा महिन्यांचे असते. याचा अर्थ असा की देवांचा दिवस सहा महिन्यांचा आणि देवांची रात्रही सहा महिन्यांची असते; परंतु प्रबोधिनी एकादशीपर्यंत चारच महिने पूर्ण होतात. म्हणून असे म्हटले जाते की, देवांच्या रात्रीचे तीन प्रहर म्हणजेच आपले चार महिने झाल्यानंतर देव जागे होतात. याचा अर्थ असा की, देव जेव्हा जागे होतात तेव्हा त्यांच्या रात्रीचा एक प्रहर शिल्लक असतो. तरीही देव जागे होतात आणि आपले कार्य करू लागतात. असेही म्हटले जाते की, नवसृष्टीनिर्मिती हे ब्रह्मदेवाचे कार्य चालू असताना पालनकर्ता श्रीविष्णू क्षीरसागरात शयन करीत असतात. म्हणून चातुर्मासास विष्णुशयन सुद्धा म्हटले जाते. चातुर्मासात विष्णू का निद्रा करतात याची सुद्धा एक पौराणिक कथा आहे.

राक्षस पुत्र बळीराजा हा एक पराक्रमी, परोपकारी आणि दानशूर राजा होता. तो विरोचनाचा पुत्र आणि भक्त प्रल्हादाचा नातू होता. बळीराजा आणि त्याची पत्नी श्री विष्णूंची अफाट भक्ती करीत असत. पाताळाबरोबरच पृथ्वी वरचा देखील तो लोकप्रिय राजा असल्याने साऱ्या पृथ्वीवर त्याचं राज्य होतं. त्याने अनेक यज्ञ केले. एकदा राक्षसांचे गुरू शुक्राचार्य यांच्या सांगण्यावरून त्याने स्वर्गावर सुद्धा आक्रमकण केलं आणि स्वर्गासहित तिन्ही लोकांवर तो राज्य करू लागला. इंद्रासहित सर्व देव श्रीविष्णू यांच्याकडे गेले आणि विष्णूंना प्रार्थना करू लागले की देवा आता तुम्हीच काहीतरी करा. स्वर्गावर आता बळीचे राज्य आहे. आता तुम्हालाच अवतार घ्यावा लागेल. श्रीहरींनी वामन अवतार घेऊन तेजस्वी ब्राह्मणाचं रूप धारण केलं. बळीराजा त्यावेळी यज्ञ करीत होता. श्रीहरी ब्राह्मण रूपात बळीराजाकडे दान मागण्यास गेले. शुक्राचार्यांनी श्रीहरींना ओळखले आणि त्यांनी बळीराजाला सावध केले की श्रीविष्णू वामन अवतार घेऊन दान मागण्यासाठी आले आहेत. "बळीराजाने दान देणं हा माझा धर्म आहे. ते मागतील ते दान मी देईन" असं शुक्राचार्यांना सांगून वामन अवतारात असलेल्या विष्णूंची त्याने पूजा केली व त्यांना वंदन करून दान मागण्यास सांगितले. श्रीविष्णूंनी बळीराजाकडे तीन पावले इतकी जमीन मागितली. बळीराजाने होकार देताच श्रीविष्णूंनी विराट रूप धारण केले आणि त्यांनी पहिल्या पावलात पृथ्वी व्यापली. दुसऱ्या पावलात स्वर्ग घेतला आणि त्यांनी तिसरं पाऊल कुठे ठेवू विचारलं असता बळीराजाने आपलं मस्तक पुढे केलं. "तिसरं पाऊल माझ्या मस्तकावर ठेवा भगवान" असे म्हणून विष्णूंनी तिसरं पाऊल बळीराजाच्या मस्तकावर ठेवताच बळीराजा पाताळात गेला. त्याची भक्ती पाहून श्रीविष्णू बळीराजावर प्रसन्न झाले आणि तुला काय पाहिजे ते माग म्हणाले तेव्हा बळीराजा म्हणाला की तुम्ही माझ्यासोबत पाताळात राहावे... श्रीहरी तथास्तु म्हणून बळीराजासोबत पाताळात राहायला गेले. इकडे सर्व देव व लक्ष्मी देवी काळजीत पडले की श्रीविष्णूंना कसे परत आणायचे. शेवटी लक्ष्मी देवींनी एका गरीब बाईचे रूप घेतले आणि पातळात गेल्या. त्यांनी बळीराजाला राखी बांधली. राखी बांधल्यावर बळीराजाने लक्ष्मी देवीला हवं ते मागायला सांगितले. लक्ष्मी देवी खऱ्या रूपात आल्या आणि श्री विष्णूंना परत वैकुंठात पाठवण्यास सांगितले. बळीराजाने लगेच श्रीहरींना देवी लक्ष्मी बरोबर परत जाण्यास सांगितलं. श्रीविष्णू अतिशय प्रसन्न झाले आणि त्याला वर मागायला सांगितले. बळीराजाने सांगितले की, या काळात तुम्ही नेहमी माझ्यासोबत पाताळात राहायचं आणि म्हणूनच श्रीविष्णू पाताळात क्षीरसागरात चार महिने योगनिद्रा घेतात. चातुर्मासातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात आणि प्रबोधिनीला उठतात असे म्हणतात आणि म्हणूनच चातुर्मासात लग्न, मुंज असे कोणतेही शुभकार्य करीत नाहीत. देवांच्या या निद्राकालात असुर शक्ती प्रबळ होतात आणि मानवाला त्रास देऊ लागतात. त्यापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने काहीतरी व्रत अवश्य करावे. म्हणजे मानवाचे कल्याण होते अशी मान्यता आहे. चातुर्मासात शक्यतो सात्त्विक भोजन करावे. कांदा, लसूण, मुळा, वांगी इत्यादी रजतम गुण युक्त पदार्थ वर्ज्य करावेत. सत्कर्म करणे, सत्संग ऐकणे, साधुसंतांची सेवा, संतदर्शन घेणे, दानधर्म करणे इत्यादी गोष्टी चातुर्मासात कराव्यात असे शास्त्र सांगते. चातुर्मासातील श्रावण मास विशेष महत्त्वाचा असतो. तर अशा या चातुर्मासाची साठा उत्तराची कहाणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण...

# ब्रह्मर्षी कश्यप



भारतीय ऋषी
डॉ. अनुराधा कुलकर्णी



सर्व कल्याणाचा भाव ठेवणाऱ्या ऋषिश्रेष्ठांच्या मंत्रांमधून आपणास नेहमीच विश्वहिताची कामना प्रकट होताना दिसते. कश्यप, असित देवल यांच्या पुढील वेदऋचेतून याचे प्रत्यंतर येईल,

वृष्टिं दिवः परि स्रव द्युम्नं पृथिव्याः अधि सहः नः सोम पृत्सु धाः ।।ऋ.मं.९सू.८.८

" हे सोमा, अन्तरिक्षातून पर्जन्यवृष्टी घडवून आण, पृथ्वीतलावरच्या शेतजमिनीत उत्तम अन्नधान्ये निर्माण होऊ दे. अन्नरस प्राशनाने आमच्या शरीरातील उत्साह, जोम वाढून आम्हाला जीवनसंग्रमात पराक्रम करण्याची प्रेरणा मिळेल " स्वतः सर्व मोहांतून निवृत्त असूनही सर्वसामान्य जनांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या या ऋषिश्रेष्ठांच्या कार्याला शतशः वंदन...!

ब्रह्मदेवाचे मानसपुत्र महर्षी मरीची व कर्दमऋषीकन्या कला यांचे महर्षी कश्यप हे पुत्र. त्याचप्रमाणे कश्यप हे वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षीपैकी व सोळा प्रजापतींपैकी एक. ब्रह्मदेवाने या सर्व प्रजापतींवर प्रजावृद्धीचे कार्य सोपविले होते. ब्रह्मदेवांच्या आदेशामुळे विविध जातीप्रजातीची, प्राणिमात्रांची संतती उत्पन्न करण्यासाठी महर्षी कश्यपांनी दक्षाच्या १७ कन्यांशी विवाह केला. या कश्यप पत्नींना लोकमाता म्हणतात आणि कश्यपांना सर्व सृष्टीचे जनक म्हणतात, कारण त्यांच्यामुळे सृष्टीचा विकास झाला. कश्यपांना आदितीपासून १२ आदित्य, दितीपासून दैत्य (हिरण्याक्ष, हिरण्यकश्यप) व मरुत, विनतेपासून गरुड, अरुण, कद्रुपासून नाग इ. संतती झाली. कश्यप हे गोत्र खूप व्यापक आहे. ज्यांचे गोत्र मिळत नाही, त्यांना कश्यपगोत्र सांगता येते. कारण सर्व जीवांची उत्पत्ती कश्यपापासून झाली, असे मानतात. महर्षींचे सर्व जीवमात्रांशी सारख्याच ममत्वाचे वर्तन होते, असाही यातून अर्थ काढता येईल.

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।गी.अ.२.५८


गीतेत स्थितप्रज्ञाचे लक्षण सांगताना भगवंतांनी कासवाचे उदाहरण दिले आहे, कासव ज्याप्रमाणे आपले अवयव सर्व बाजूंनी आत ओढून घेते त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ पुरुष आपल्या इंद्रियांना विषयमोहापासून सर्व प्रकारे आवरून घेतो. कासवाला कश्यप हेही एक नाव आहे. साऱ्या सृष्टीचे जन्मजाते असूनही महर्षी कश्यपांना "मी, माझे'' पणाचा मोह नव्हता. त्यामुळे त्यांचे कश्यप हे नाव सार्थच होते. कश्यपांचे ताक्ष्य व अरिष्टनेमी अशीही नावे आहेत. महर्षी कश्यपांचा आणि ब्रह्मर्षी वसिष्ठांचा घनिष्ठ संबंध होता. त्या दोन विश्वात्मक प्रवृत्तीच्या महात्म्यांमध्ये ब्रह्मज्ञानाचे तसेच जगत कल्याणांच्या विचारांचेच आदानप्रदान होत असावे.

श्रीविष्णूंच्या वराह अवतारात हिरण्याक्ष व नृसिंहअवतारात हिरण्यकश्यपू हे आपले दोन्ही सामर्थ्यवान पुत्र मारले गेले म्हणून कश्यपांची पत्नी दिती अस्वस्थ झाली होती. आपल्याला अजून एक असाच सामर्थ्यशाली पुत्र असावा की, जो इंद्राचा पराभव करू शकेल, असे तिला वाटू लागले. त्यासाठी ती आपले पती कश्यप यांची विशेष सेवा करू लागली. तिच्या सेवेने प्रसन्न होऊन कश्यपांनी तिला हवे ते माग म्हटले, तिने आपल्या मनातील इच्छा त्यांना सांगितली. ते ऐकून कश्यप मुनींना वाईट वाटले पण आता त्यांना तिला दिलेला शब्द पाळणे भाग होते. मात्र त्यांनी आपल्या द्रष्टेपणाने विचार केला की, आधी दितीकडून वैष्णवव्रत म्हणजेच सदाचाराचे व्रत पाळून घ्यावे, त्यामुळे तिच्या बुद्धीतही फरक पडेल आणि तिला होणाऱ्या पुत्रावरही चांगले संस्कार घडतील. या विचाराने कश्यप मुनींनी दितीला सांगितले की तुला वर्षभर काही नियम पाळावे लागतील, तरच तुला हवा तसा पुत्र होईल. ही अट दितीने लगेच मान्य केली. वर्षभर कोणाचीही हिंसा करायची नाही, कोणावरही क्रोध करायचा नाही, असत्य भाषण करायचे नाही. शारीरिक-मानसिक शुचित्वाचे व्रत पाळायचे असे ते नियम होते. पुत्रलाभाच्या तीव्र इच्छेने दिती हे नियम कसोशीने पाळू लागली...

(उर्वरित कथा पुढील भागात)

anuradh.klkrn@gmil.com

# "जीवनविद्या विद्यानाम्''




जीवन संगीत
सद्गुरू वामनराव पै



परमेश्वर आपल्या गुरुस्थानी आहे. त्याच्याकडे जे ज्ञान आहे ते आपल्याला मिळवता आले पाहिजे. एकदम सर्व ज्ञान मिळवता येणार नाही, पण टप्प्याटप्प्याने मिळवता येते. देवाबद्दलचे ज्ञान हे पायाभूत ज्ञान आहे. ते तरी मिळवले पाहिजे. जीवनविद्येचे ज्ञान हे जीवनाचे पायाभूत ज्ञान आहे. पूर्वी "अध्यात्म विद्या विद्यानाम्'' असे म्हणायचे. आता "जीवनविद्या विद्यानाम्" असे म्हटले पाहिजे. जीवनविद्या जर तुम्हाला समजली नाही, उमजली नाही, तर तुम्ही कधीही संपूर्ण सुखी होणार नाही. ज्याला जीवनविद्या समजली, उमजली तो सुखी झालाच पाहिजे. कारण जीवनविद्येत तुम्हाला खरे ज्ञान मिळते. जीवनविद्येचे हे खरे ज्ञान मिळाले की अहंकार जातो. तुमच्या ठिकाणचा अहंकार गेला की नाही यावर तुम्ही देवाचे खरे भक्त आहात की नाही हे ठरते. परमेश्वर आपल्याला आचरणीय आहे. देव कसा आहे? तो सर्व करतो, पण मी करतो असे म्हणत नाही. तसे आपण सर्व करायचे. संसारही करायचा. संसार वाईट कुणी म्हटले आहे? संसार चांगलाच आहे. संसार मी करतो असे म्हणायचे नाही. हे सगळे जे करतो ते देव करतो असे म्हणा. कारण ती वस्तुस्थिती आहे. प्रत्यक्षात सगळे काही देवच करतो आहे, पण आपण मी करतो असे म्हणतो. तेव्हा ते वस्तुतः सत्य नसते. आपण वस्तुस्थितीपासून दूर गेलेले असतो म्हणून आपल्याला ताप होतो. एकदा का देवाच्या अस्तित्वाची जाणीव करून घेतली, देवाबद्दलचे ज्ञान, देवाबद्दलची माहिती करून घेतली की, आपल्याला आहे काय, नाही काय, आहे कोण, नाही कोण, हे सगळे चालते, ते कसे चालते हे कळेल व आपला अहंकार जागच्या जागी मुरून जाईल. "साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला, ठायीच मुराला अनुभवे'' मुराला म्हणजे काय? मरून उरला. मरून उरला म्हणजे काय? कापूर जळतो व सुगंध रूपाने उरतो. कापूरला अग्नी लागला की, कापूर जळतो, पण तो कापूर सुगंध रूपाने उरतो. तसेच आपण स्वानंद रूपाने उरतो, पण हे सर्व समजून घेतले पाहिजे व त्यासाठी सद्गुरू पाहिजेत. साधुसंत किंवा सद्गुरू उपदेश सर्वांनाच करतात, पण त्या उपदेशाचा बोध मात्र थोड्यांनाच होतो. एक तर्काच्या अधिष्ठानावर झालेला समजुतीचा बोध व दुसरा अनुभवाच्या अधिष्ठानावर झालेला प्रत्यक्ष बोध. या दोन्ही बोधातील अंतर दोन ध्रुवाइतके आहे. हे अंतर तोडण्यासाठीच संतमायबाप आपणाला साधना करण्यास सांगतात. सर्व साधनांचे सार म्हणजेच भगवन्नाम. नामाच्या अखंड उपासनेने, उच्चाराने साधकाच्या बुद्धीत प्रकाश पडतो. त्याची प्रज्ञा जागृत होते व त्याला आपल्या खऱ्या स्वरूपाचा बोध होतो. या बोधालाच आत्मानुभव असे म्हणतात. या अनुभवाने साधक जीवभावाने मरतो व आत्मरूपाने उरतो.

# कर्म उगमाचं ओझं खास



ऋतुराज
ऋतुजा केळकर



जगण्याच्या या प्रवासात कर्म आणि कर्मभोग यात एक नाजूक धागा आहे. अगदी फुलांच्या पाकळ्यांसारखा नाजूक की जो काळजीपूर्वक सांभाळायचा असतो, त्यातच असलेला एक अनिवार्य नश्वरता असलेला, येवूडेपणाचा छाया असलेला धागा लक्षात घेऊन. जणू एखाद्या निर्माल्याप्रमाणे, ज्याचा कणाकणात एक गोडवा तर आहे, पण तो तुटण्याची भीतीसुद्धा सतत उभी असते. नाजूक फुले यांच्या कर्मभोग क्रमाच्या सिद्धांतात, हा नाजूक आणि नश्वर धागा एक गहन आणि सूक्ष्म तत्त्वज्ञानाने परिपूर्ण होतो की जो आयुष्याला एका नव्या दृष्टीने उलगडतो की, आज आपण जे काही करत आहोत, त्याचे फळ आम्हाला नक्कीच भोगावे लागेल, तेव्हा त्या फुलांच्या सौंदर्याप्रमाणेच कर्मांच्या परिणामांचीही काळजी घेणे गरजेचे आहे.

आपले कर्म हे केवळ कृती नाही तर ते एक फिरत राहणारं चक्र आहे जणू एक संथ आवर्तनच. जसं एखादं फूल हळूच उमलण्याकरिता सूर्याची वाट पाहतं आणि मग कधीतरी गंध देत निर्माल्य होतं, तसंच प्रत्येक कृतीचंही काहीतरी फळ असतंच, जणू आकाशात पाठवलेली एक श्वासभर प्रार्थना. फुले आपल्याला सांगतात "जी कर्म करतो, त्याचं फळ त्याला भोगावंच लागतं." पण त्याचे फळ? ते कधी मिळेल? कसे प्रकट होईल हे समजून घ्यायला, माणसाला जगण्याच्या काठावर उभं राहून शांतपणे पाहावं लागतं. ते कधी एखाद्या दवबिंदूसारखं अलगद हातात येतं तर कधी क्षितिजापल्याड हरवून जातं. म्हणजे कसं आहे ना की ते असतं नाजूक पण थेट हृदयाला भिडणारं तर कधी आयुष्याच्या संध्याछायेत हरवून जाणारं मागे फक्त एक गंध ठेवून.

कर्म हे केवळ कृती नव्हे तर ते एक शांतपणे फिरत राहणारं चक्र आहे. न सांगता, न दिसता, रोज आपल्या आयुष्यात काहीतरी विणत राहणारं. माणसाची प्रत्येक कृतीही कुठे तरी, कधी तरी, आपल्याला काहीतरी परत देण्याची अनाम शपथ घेत असते. कर्मांच्या त्या साखळीत कुठेतरी एक कोमल स्पर्श असतो, अगदी हलकासा जसा एखादा वाऱ्याचा श्वास कपाळावरून जातो. जेव्हा आपण चुकतो, गोंधळतो, काळजीचे ढग मनभर दाटून येतात तेव्हा परमेश्वर फार काही बोलत नाही पण तो आपली पावले ओळखतो. तो आपल्या शेजारीच असतो. माफ करणं त्याच्या स्वभावात आहे, पण न्याय सोडणं त्याच्या धर्मात नाही.

त्याचं प्रेम आहेच आपल्यावर पण त्याचा न्याय स्थिर, गाभ्याशी खोल रुजलेला असतो. कारण आयुष्य फक्त भावना नाही. म्हणून तो आपल्या कर्मांचं फळ देतो हळूच पण वेळेनुसार. जसं एखादं झाड सावकाश फळ देतं. त्यात गोडवा असतो, कधी कडूपणा पण, ते फळ नेहमी आपल्या हातात येतंच अगदी योग्य क्षणी. अगदी माझ्याच शब्दांत सांगायचं झालं तर,

फुलासारखी गंधाची आस...
कर्म उगमाचं ओझं खास
तो शांत उभा पाठीमागं...
देतो फळ, पण न
करता त्रास...



# पापकर्मे



आत्मज्ञान
प्राची परचुरे वैद्य



पापाचा प्रभाव पाहण्याचा असेल तर चढता काळ न पाहता उतरता काळ पाहा. निसर्ग आपल्या प्रत्येक घडमोडींची नोंद घेत असतो. वेळ ही खूप बलशाली असते. निसर्गाने आपल्याला एकदा संधी दिल्यानंतर निसर्ग योग्य वेळ येईपर्यंत हस्तक्षेप करत नाही. पण आपल्याला बहाल केलेल्या संधीच सोने करता आलं पाहिजे. या दरम्यान केलेल्या कर्मावर पुढील मूल्यमापन ठरतं हे वास्तव आहे. आपल्या जीवनात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटना, घडामोडी आणि त्यामध्ये असणारी आपली भूमिका योग्य की अयोग्य हे निसर्ग त्याच्या निरीक्षणावरून ठरवत असतो आणि त्याचं योग्य अयोग्य फळ हे तत्काळ नाही तर एक विशिष्ट कालावधी दरम्यान नक्कीच मिळत असतं. निसर्ग संधी देत असतो आणि आपण संधीचा सदुपयोग केला, तर आपलं कल्याण होतं आणि दुरुपयोग केला, तर निसर्ग फक्त निरीक्षण करतो आणि दुरुपयोगाचं फळ असं काही देतो की, त्याची कल्पना करणं कठीण असतं. म्हणून कधीही एखाद्याचा काळ पाहताना प्रभाव पाहताना चढता काळ पाहू नका उतरता काळ कसा आहे. त्यावर आपले कर्म चांगले की वाईट हे ठरत असतं म्हणून आपण आपलाही उतारकाळ चांगल्या पद्धतीने गेला पाहिजे यासाठी योग्य पद्धतीने आचरण केले पाहिजे. तसेही आपल्या कोणत्या जन्मातील कोणते फळ कधी मिळेल सांगता येत नाही. आपल्या वागण्याचा प्रभाव आणि मूल्यमापन योग्य पद्धतीने करता आलं पाहिजे. जसा रोजचा दिवस वेगळा असतो तसाच काळही बदलत असतो. अखंड एकसारखा काळ कोणाचाही सारखा राहत नाही, पण आपण पाहताना फक्त पाप काळातील प्रगती पाहिलेली असते, पण उताराळातील स्थिती आपण पाहत नाही म्हणून आपलं चांगल्या वाईट कर्माचं मूल्यमापन चुकतं, पण सर्वसाधारणपणे चांगलं कर्म करून कधी-कधी चांगलं होत नाही आणि उलट वाईट कर्म केल्यानंतर वाईट न होता प्रगती आलेख उंचावतो हे वास्तव आहे. म्हणजे चढत्या काळात कितीही वाईट कर्म केले तरीसुद्धा काही होत नाही हा आपला वरकरणी समज असतो. कारण आपण एखाद्याचा पापकर्म होत असताना त्याचा चढता काळ पाहून चकीत असतो आणि काही काळ आपलाही पाप-पुण्य निसर्ग यावरील विश्वास निश्चित कमी होतो, पण वास्तव आणि सत्य यापेक्षाही वेगळं असतं.

एखाद्याचा काळ असेल तर तो पाप करताना पाहा आणि जेव्हा पापाची मर्यादा पूर्ण होते आणि काळाचा महिमा प्रभाव कशा पद्धतीने बदलतो ते पाहा. उतारकाळ चालू होतो तेव्हा काळाचा पाप पुण्याचा प्रभाव काय असतो हे पाहा. नक्कीच लक्षात येईल की, निसर्ग नैसर्गिक न्याय हा आहेच आणि कसं क्षणात होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याच होतं म्हणजे एकंदरीत चांगलं कर्म हे कधीही चांगलं असतं. आपला पाहण्याचा दृष्टिकोन अगोदर बदला पाहिजे. आपण ज्या पद्धतीने प्रभावित होतो आणि मूल्यमापन ठरवून त्याच पद्धतीने आचरण करण्याचा विचार करतो. आपण नेहमी चांगल्या गोष्टींचा विचार करावा. चांगले कर्म आपल्याला चांगलेच फळ देणार यावर विश्वास ठेवा. आपण फक्त पाप काळातील प्रभाव पाहिलेला असतो म्हणून आपला पाप पुण्यावर आणि चांगल्या वाईट कर्मावर आपला विश्वास बसत नाही, पण हे वास्तव आहे की जसं कर्म तसं फळ असतं. यामध्ये वेळ आणि काळाचा प्रभाव हा प्रभावी जरी असला तरी तो कायम सदैव प्रभावी राहत नाही. म्हणून आपल्याला आपल्या चांगल्या काळात जास्तीत जास्त चांगली कर्मे करता आली पाहिजेत. जेणेकरून भविष्यात उतारकाळ चालू झाल्यावर कोणताही वाईट परिणाम आपल्यावर होणार नाही हेच जीवनात महत्वाचे आहे.



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी विठ्ठल तुपसौंदर यांची निवड

## १०५ फकिरा कादंबरीचे होणार वाटप - विठ्ठल तुपसौंदर

माजलगाव / प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने सोमवार दिनांक १४ जुलै रोजी शहरातील पंचशील नगर व लहुजी नगर येथे समाज बांधवांच्या प्रमुख उपस्थितीत प्राथमिक आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत जयंती समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जयंती समितीच्या अध्यक्षपदी सवार्नुमते येथील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारे विठ्ठल तुपसौंदर यांची तर , उपाध्यक्षपदी कच्छिन्द्र कांबळे ,सचिवपदी धम्मानंद गावडे, तर कोषाध्यक्षपदी रुद्रा कासार यांची सवार्नुमते निवड करण्यात आली असता यंदाच्या जयंती सोहळ्यात माजलगाव शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे कमिटीच्या वतीने कळवण्यात आले आहे. प्रसंगीकरण



अलझेंडे,अतुल अलझेंडे,संतोष कांबळे,अमर भिसे, आकाश गालफडे,प्रताप तुपसौंदर ,भैया भिसे व राणू मिसाळ, वैभव जावळे, मारोती साळवे ,विशाल अलझेंडे ,लखन कांबळे यांच्या सह पंचशील नगर व लहुजी नगरातील जेष्ठ नागरिक तथा युवकांची उपस्थिती होती. भव्यदिव्य अशा या जयंती च्या माध्यमातून १०५ फकिरा कादंबरी चे वाटपा सह अनेक सामाजिक उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती समिती अध्यक्ष विठ्ठल तुपसौंदर यांनी बोलताना दिली.

# कन्नड येथील विद्यालयात शालेय मंत्रिमंडळाची निवड

## राजनंदनी राठोड मुख्यमंत्री तर संस्कार बारगळ उपमुख्यमंत्री

## साधना पाटील व साने गुरुजी विद्यालयातून लोकशाही मूल्यांचे शिक्षण

## साधना पाटील व साने गुरुजी विद्यालयात लोकशाहीचे धडे

## साधना पाटील व साने गुरुजी विद्यालयात लोकशाही मूल्यांची पेरणी

**कन्नड / विशाल भालेराव**

शहरातील नरसिंगपूर, कन्नड येथे साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साधना पाटील प्राथमिक व साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक अत्याधुनिक पद्धतीने पार पडली. मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून व शिक्षक सागर पाटील, पांडुरंग मगर, नामदेव पवार यांच्या उपक्रमशीलतेतून ही निवडणूक प्रकिया सोमवारी (दि.१४) जुलै रोजी मोठ्या उत्साहात राबविण्यात आली.



साधना पाटील व साने गुरुजी विद्यालय नरसिंगपूर शालेय निवडणुकीनंतर निवडून आलेल्या मंत्रिमंडळ सदस्यांसमवेत मुख्याध्यापक व शिक्षक.

साधना पाटील व साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात सन २०२५-२६ या शैक्षणिक वषार्तील शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ सरकारसाठी सर्वप्रथम इच्छुक विद्यार्थ्यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. उमेदवारांना निवडणूक चिन्हे देऊन प्रचारासाठी कालावधी देण्यात आला होता. प्रचारादरम्यान विद्यार्थ्यांनी 'ताई', 'दादा', 'भाऊ' अशी साद घालत मतदारांशी जिव्हाळ्याचं नातं निर्माण केलं. काही विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये तयार केली, वर्गांमध्ये जाऊन प्रचार फलक दाखवले. संपूर्ण शाळा निवडणुकीच्या वातावरणाने भारलेली होती. मतदानाच्या दिवशी गुप्त पद्धतीने इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनच्या माध्यमातून मतदान घेण्यात आलं. इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतच्या २७६ विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. काटेकोर व निःपक्ष मतमोजणीनंतर विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली. निवडणुकीत एकूण नऊ पदांसाठी प्रक्रिया पार पडली. विजयी उमेदवारांचे उत्साहात स्वागत करण्यात आले, तर पराभूत उमेदवारांनी पुढील निवडणुकीसाठी निर्धार व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील व संस्थेचे सचिव टी.एस.कदम यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून विजेत्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नामदेव पवार व अमोल घुगे, तर निवडणूक अधिकारी म्हणून सुनील मोरे, श्रीराम जाधव, नितीन मगर यांनी जबाबदारी सांभाळली. मतमोजणी अधिकारी म्हणून पांडुरंग मगर व सागर पाटील कार्यरत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका विजया कुमावत, अस्मिता कदम, मंजिरी कदम, प्राजक्ता तागवाले, उज्वला सोनुने, मनीषा बारगळ, प्रभाकर चौधरी, सुभाष आघाडे, आनंद रनयेवले आदींनी विशेष मेहनत घेतली.

### विद्यालयातील शालेय मंत्रिमंडळ

- मुख्यमंत्री – राजनंदनी गोकुळ राठोड
- उपमुख्यमंत्री – संस्कार सुदाम बारगळ
- अभ्यास मंत्री – आदिती गणेश जाधव
- स्वच्छता मंत्री – यश किशोर राठोड
- क्रीडामंत्री – राजेश्वरी बापू गुंजाळ
- शिस्तमंत्री – अंजली राजेंद्र मालकर
- सांस्कृतिक व परिपाठ मंत्री – संदेश रवींद्र चव्हाण
- शालेय पोषण आहार मंत्री – अनिकेत कारभारी दांडगे
- बागकाम मंत्री – शैलेश सुकलाल महेर

### लोकशाही प्रक्रियेचं शिक्षण शाळेतच मिळालं

● आमच्या शाळेने घेतलेल्या शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीमुळे आम्हाला लोकशाही प्रक्रियेचं खूप चांगलं शिक्षण मिळालं. मतदानपूर्व तयारी, प्रचार, निवडणूक चिन्हं, गुप्त मतदान आणि मतमोजणी हे सर्व अनुभव आम्हाला स्वत : अनुभवायला मिळाले. आम्ही फक्त पुस्तकात वाचायचो की, मतदान म्हणजे काय, पण आज ते प्रत्यक्ष अनुभवलं. ही निवडणूक आमच्यासाठी एक संस्मरणीय अनुभव ठरली. अशा उपक्रमांमुळे आम्हाला आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणही विकसित करता येतात. आमच्या शाळेने आम्हाला दिलेला हा अनुभव कायम लक्षात राहील. – **तन्वी मोरे, विद्यार्थिनी, इयत्ता सातवी**

### पहिलीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप

● साधना पाटील प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने मोफत दप्तरे वितरित करण्यात आली. या उपक्रमात मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करून शाळेने हा स्तुत्य उपक्रम राबवला असून पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रोत्साहनाबद्दल आभार व्यक्त केले.

# सुदर्शन विद्यालयात नवीन शिक्षकांचा सत्कार

## पत्रकार समीर शेख यांनी केले प्रेरणादायी मार्गदर्शन



**आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयात बदली होऊन व नव्याने शिक्षक पदावर नियुक्त झालेल्या शिक्षकांचा सत्कार सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. धोंडे सर, ढोले सर, हजारे सर, नालकोल सर आणि श्रीकृष्ण मरकड सर यांची शाळेत शिक्षक म्हणून निवड झाल्यानंतर शाळेच्या वतीने सकाळी परिपाठात त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या विशेष प्रसंगी पत्रकार सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांच्या हस्ते सरस्वती पूजन करत विद्याथ्यार्नां स्पर्धा विषयी समीर शेख यांनी परीक्षा मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासातील सातत्य, वेळेचे व्यवस्थापन, वाचनाचे महत्त्व तसेच आगामी स्पर्धा परीक्षांची दिशा याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हे मार्गदर्शन उत्साहाने ऐकले आणि शंका समाधान सत्राद्वारे संवाद साधला. या कार्यक्रमात शिक्षकांनी समीर शेख यांच्या लेखन क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक कार्याबद्दल विद्यालयाच्या वतीने माझा विशेष सन्मान करण्यात आला. सत्कार सोहळ्याचे आयोजन अतिशय प्रेरणादायी आणि सौहाद्यपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रसंगी मुख्याध्यापक साईनाथ बोडके सर , हाके सर, बाबुराव खिलारे, सचिन जाधव, ससाणे मॅडम आदी मान्यवर व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन उत्कृष्ट करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना नव्या संधी व मार्गदर्शनामुळे शिक्षणात नवे ऊर्जा मिळाल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

# पैठण येथील विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित खाऊचे वाटप



**पैठण : सर्जेराव खडसन**

पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे पैठण तालुका अध्यक्ष तथा दैनिक ₹वास्तव ₹चे तालुका प्रतिनिधी संजय खडसन यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब सोनवणे यांच्यावतीने शहरातील पवन सुत हनुमान वारकरी शिक्षण संस्थेमधे वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना फळ व खाऊचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भागवत उपासक हभप वाल्मीक महाराज जमधडे,हभप आकाश महाराज मराठे, हभपअजय महाराज माळी, संदीप पांडव,राहुल कमानदार रामदास गुडे, पत्रकार बबन उदावंत,राजू चाबुकस्वार, ज्ञानेश्वर वैष्णव,पंडीत,अमोल खरात, चाबुकस्वार,विकास खंडागळे, सिद्धार्थ खंडागळे, कैलास बर्फे, अकील शेख,लक्ष्मण खंडागळे,व इतरांची उपस्थिती होती.

# सुनिता गुंडरे यांचे हरिणी वस्तीगृह म्हणजे लातुरात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींसाठी हक्काचे व सुरक्षित ठिकाण

**माजलगाव / अरविंद ओव्हाळ**

मराठवाड्यातील शिक्षणाचे माहेरघर म्हणून परिचित असलेल्या लातुर येथे शिक्षणानिमित्त येणाऱ्या मुलींसाठी हक्काचे व सुरक्षित ठिकाण म्हणून हरिणी मुलीचे वस्तीगृह ओळखले जाते.कारण या वसतीगृहात मुलींच्या संरक्षणासह अभ्यासाकडेही जातीने लक्ष दिले जात असल्याने पहिल्याच वर्षी हे वस्तीगृह मुलींसह पालकांचे पहिल्या पसंतीचे वस्तीगृह ठरले आहे.

गेल्या तीन चार दशकांपासून मराठवाड्यातील शिक्षणाचे माहेरघर म्हणून लातुरची ओळख निर्माण झाली आहे.तर लातुरात शिक्षण घेणारे विद्यार्थी हे टॉपर असल्याने या शिक्षणाच्या पद्धरीत, लातूरचा आगळा वेगळा पॅटर्न म्हणून लातूरची संपूर्ण राज्यभरात ओळख आहे.याच लातुर शहरात शिक्षणासाठी लातुर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाडा व मराठवाड्याबाहेरुन संपूर्ण महाराष्ट्रातील मुले,मुली येतात. त्यातील बहुतांश मुले,मुली वसतीगृहातच वास्तव्यास असतात. त्यामुळे लातुरात विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात वस्तीगृह झाले आहेत. मात्र त्यात मुलींसाठी स्वतंत्र,सुरक्षित,गोंगाट व इतर टारगट प्रवृती पासुन अलीप्त पोषक अहारासह रहाण्याची व अभ्यासाची सोय असलेल्या वस्तीगृहाची अवश्यकता होती या बाबतची चिंता मुलींच्या पालकांना सतत सतावत होती .कारण तेथे मुलींना सुरक्षितवातावरण मिळने , त्यांचे वेळेवर खाणेपिणे,ताजा व पोषक आहार, अभ्यासाठी शांत व प्रसन्न वातावरण मिळणे,वेळेची बचत करत शाळा, कॉलेजला जाता येणे अशा अनेक प्रश्नांनी पालक वर्ग चिंतेत असताना. मुलींच्या पालकांची नेमकी ही समस्या ओळखून लातुर जिल्ह्यातील परंतु बीड जिल्हा ही त्यांची कर्मभूमी ठरलेल्या, बीड जिल्हाशी त्यांचे एक वेगळे नाते निर्माण झालेल्या , बीड जिल्ह्यातील दिर्घकाळ वास्तव्यातुन निर्माण झालेली नाती जोपासण्याचा दृष्टीकोनातून सौ.सुनिता ताई प्रफुल्लचंद्र गुंडरे यांनी खास मुलींसाठीचे हरिणी नावाचे मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह जयक्रांती कॉलेजच्या मागे ढगेज इंग्लिश क्लासेसच्या बाजुस ट्युशन एरियात चालु केले .चालु शैक्षणिक वर्षांपासून चालु केलेल्या मुलींच्या वस्तीगृहास पहिल्याच वर्षी मोठा प्रतिसाद मिळाला.त्यांनी केलेल्या अपेक्षेपेक्षा त्यांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे.सौ. सुनिताताई गुंडरे या स्वतःच उच्च शिक्षित असुन, त्यांना समाज कायार्ची आवड आहे.शिवाय त्यांना अध्यापनाचीही आवड असल्याने याचा फायदा या हरिणी वस्तीगृहात राहणाऱ्या मुलींना होत आहे.या वस्तीगृहात प्रवेश घेणाऱ्या मुलींसाठी सर्व प्रथम संरक्षण,सुरक्षितता व चांगला आहार याला गुंडरे यांनी प्राधान्य देत, अतिशय अल्प दरात व गोरगरीब पालकांना परवडेल अशी फीस ठेवली.खास मुलींसाठी चालु केलेल्या या वस्तीगृहात गुणवंत व गोरगरीब मुलींसाठी विशेष योजना लागु करत त्यांना वस्तीगृह फीस मध्ये कांही सुट दिली. प्रफुल्लचंद्र गुंडरे यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.सुनिताताई गुंडरे यांनी चालु केलेल्या या मुलींच्या वस्तीगृहास पहिल्याच वर्षी ग्रामीण भागातील पालकांनी मोठा प्रतिसाद दिला असुन, तेथे मिळत असलेल्या सुविधा मुली आपल्या पालकांना सांगत, आपण या वसतीगृहातुन मिळणाऱ्या सुविधांवर खुष असल्याचे फोन पालकांना करत असुन, पालक इतरांना सांगत असल्याने हे वस्तीगृह लातुरच नव्हे तर मराठवाडा व संपूर्ण महाराष्ट्रात अल्पवधीतच प्रसिद्ध होऊन, मुलींसह पालकांच्या विश्वास पात्र ठरले आहे.तर अनेक पालकांनी यावर्षी इतर वस्तीगृहात आपल्या मुलींचे प्रवेश घेतले असल्याने त्यांनी पुढच्या वषीर्चा प्रवेश यंदा बुकिंग केला आहे. तर हे वस्तीगृह मुलींसाठी एक घरच असल्याच्या प्रतिक्रिया मुली व्यक्त करत आहेत. अल्पवधीतच सर्वांच्याच विश्वास पात्र ठरलेले हे वस्तीगृहामुळे ग्रामीण भागातील मुलींच्या पालकांची चिंता मिटली असुन, पालक वर्ग आता इतरत्र न जाता आपल्या मुलींना या हरिणी वस्तीगृहातच प्रवेश घेत असल्याचे दिसत आहे.याबाबत हरिणी वस्तीगृहाच्या सर्वेसर्वा तथा संचालक सौ.सुनिताताई गुंडरे म्हणाल्या की,आम्ही पैसे कमवण्यासाठी वस्तीगृह चालु नसुन, आपल्या हातुन सामाजिक कार्य घडुन समाजसेवा घडावी. या हेतूनेच वस्तीगृह चालु असुन, ना नफा ना तोटा या तत्वावर वस्तीगृह चालु केले असुन, या मुली या दोन्ही घरची लक्ष्मी असते तीचा आदर, सुरक्षा,रक्षण करणे आपले कर्तव्य असुन, या माध्यमातून तेही करता यावे .म्हणूनच केवळ मुलींसाठी वस्तीगृह चालु करण्याचा निर्णय घेत, ते चालु केले आहे.आणि पहिल्याच वर्षी अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला आहे. यापुढील काळात ही आम्ही सर्व सुविधा अल्प दरात देऊन, आमच्यावर ठेवलेला विश्वासास पात्र ठरु.अशी प्रतिक्रिया सौ.सुनिताताई प्रफुल्लचंद्र गुंडरे यांनी व्यक्त केली.तसेच ज्या मुलींना हरिणी वस्तीगृहात प्रवेश घ्यायचा त्यांनी ९४२१३४३५८४, ८७६७१०७४५०,७७७५९७६३६३ यावर संपर्क साधुन आपला प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन संचालिका सौ.सुनिताताई प्रफुल्लचंद गुंडरे यांनी केले आहे.



# डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेचे पुनर्गठन

**पाचोड : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत कार्यरत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेचे पुनर्गठन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्षेत्रातील प्राचार्य, महाविद्यालय, प्राध्यापक,विद्यार्थी इ. घटकांच्या समस्या, धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभाग आणि प्रशासकीय अडचणी सोडवण्यासाठी अशासकीय प्राचार्यांची स्वतंत्र संघटनेचे पुनर्गठन करण्यात यावे. या विचारांच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य फोरम कार्यान्वित करण्यासाठी संघटनेची बैठक विद्यापीठ नाट्यगृहात १७ जून, २०२५ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्राचार्य संघटनेचा पाया घालण्यासाठी प्रारंभिक निर्णय घेण्यात आला.



त्यानंतर दुसरी महत्त्वपूर्ण बैठक दिनांक 29 जून, 2025 रोजी मिलिया महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत निवृत्त सदस्यांचा यथोचित सन्मान करुन दिवंगत सदस्य यांना श्रद्धांजली अर्पण करुन रिक्त कार्यकारिणी सदस्यांच्या जागी नवीन सदस्य नियुक्त करण्याचा ठराव संमत करण्यात आला. वरील ठरावाच्या अनुषंगाने 13 जुलै, 2025 रोजी शिवाजी महाविद्यालय, पाचोड येथे संघटनेची तिसरी बैठक पार पडली. यामध्ये जिल्हानिहाय नवीन पदाधिकारी आणि सदस्यांची निवड करण्यात आली. या बैठकीत खालीलप्रमाणे कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आले. अध्यक्ष झ्र डॉ. विजय भोसले, प्राचार्य, शिवाजी विद्यालय, कन्नड उपाध्यक्ष झ्र डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य, आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा सचिव – डॉ. सोपान निंबोरे-प्राचार्य, ॲड.बी डी हंबर्डे महाविद्यालय, आष्टी सहसचिव-डॉ हरिदास फेरे प्राचार्य, वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी कोषाध्यक्ष-डॉ भारत खंदारे प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय परतूर. जिल्हा निहाय नवनियुक्त कार्यकारणी सदस्य, धाराशिव – डॉ. प्रशांत चौधरी, बीड – डॉ. शिवदास शिरसाठ, अंबाजोगाई, डॉ. मोहम्मद ईलीयास, जालना – डॉ. रामेश्वर पवार,अंबड डॉ. सुनंदा तिडके. छत्रपती संभाजीनगर – डॉ. चंद्रसेन कोठावळे, डॉ. अशोक पंडित, डॉ. मजहर फारुकी आदींची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतरच्या बैठकीत पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. 1) जिल्हानिहाय संघटना नव्याने बांधणे 2) नवीन प्राचार्यांना नेतृत्वाची संधी देणे. 3 ) विद्यार्थ्यांच्या अडचणी, शैक्षणिक वातावरण आणि दैनंदिन प्रशासनातील समस्या यावर विद्यापीठासी समन्वय साधून योग्य निर्णय घेणे. 4) मा. कुलगुरू डॉ. विजय फुलारी सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन शैक्षणिक विकासासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे. आदी निर्णय घेण्यात आले. निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांनी सर्व प्राचार्यांचे आभार मानत.

# शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ . गायकवाड यांचा स्तुत्य उपक्रम



**रायमोहा / प्रतिनिधी**

येथील मुस्लिम समुदायाच्या ईदगाहा परिसरामध्ये शिवप्रतिष्ठांचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक डॉ.रोहिदास गायकवाड यांच्या संकल्पनेमधून सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून ईदगाहा परिसरामधील भागामध्ये झाडे लावण्याचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी शिरूर पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री जालिंदर काका सानप रायमोहचे माजी सरपंच श्री हाशम भाई शेख माजी उपसरपंच श्री सुलेमान पठाण माजी उपसरपंच मुराद पठाण , पठाण गुलजार, शेख फारूख, शेख नजीरभाई रशीद पठाण युवराज जाधव सर,शेख ताजुद्दीन सर सामाजिक प्रतिष्ठानचे प्रकाश गायकवाड शेख अकिल, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी वृक्षारोपन



**माजलगाव / प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर तेलगाव ता.धारुर जि.बीड येथे दि.१६/०७/२०२५ रोजी केंद्र शासनाचे ₹एक पेड मॉ के नाम₹ मोहिमे अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधून कारखान्याचे जेष्ठ संचालक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब व कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. धैर्यशीलकाका सोळंके साहेव यांचे अध्यक्षतेखाली व मा.चेअरमन साहेब श्री. विरेंद्रदादा सोळंके, मा.व्हाईस चेअरमन साहेब श्री. जयसिंगभैय्या सोळंके व कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री.आर.सी. बडगुजर साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत, मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. देशमुख व्ही.ए. यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी मा. चेअरमन साहेब, मा. व्हाईस चेअरमन साहेब व कार्यकारी संचालक यांचेही हस्ते वृक्षारोपन करणेत आले.

जार्गातक पर्यावरणाचा समतोल तसेच भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सामाजिक बांधिलकी तसेच केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमा अंतर्गत कारखाना दरवर्षी कारखाना परिसरात वृक्ष लागवड करीत असुन आतापर्यंत कारखाना परिसरात एकुण ११७०९ झाडे लावणेत आलेली असुन ती चांगल्या पध्दतीने जोपसलेली आहेत. या कार्यक्रमास कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.आर.सी. बडगुजर, जनरल मॅनेजर (आसवणी) श्री.डी.एम. वरे, जनरल मॅनेजर (इंजि.) श्री.एस.एस. शिनगारे, मुख्य शेतकी अधिकारी श्री. आर. आर. देशमुख, सचिव श्री. सुरेश लगड, चिफ अकोटंट श्री.एस.बी.घाडगे, चिफ केमीस्ट श्री.बी.एस. झोडगे, माकेर्टींग मॅनेजर श्री. जुनेद बागवान, पर्यावरण अधिकारी श्री. डी.डी.पोपळे, पर्चेस ऑफिसर श्री.जे.एन. पाटील, सिव्हील इंजिनिअर श्री.डी.बी.मोरे, कारखान्यातील सर्व कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने उडाली खळबळ

# बिडकीन पोलिस ठाण्यातच महिला पोलिसाला महिलेने केली मारहाण

**पैठण / सर्जेराव खडसन**

संशयित आरोपी सोबत आलेल्या एका महिलेने कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिसाला चक्क पोलीस ठाण्यातच शिवीगाळ करून मारहाण केली असल्याचा धक्कादायक प्रकार बिडकीन पोलिस ठाण्यात घडला असल्याने एकच खळबळ उडाली आहे.पोलिसांनी त्या महिले विरोधात विविध कलमाखाली गुन्हा नोंदवून अटक केली आहे. सदरील धक्कादायक घटनेमुळे इथे पोलिसच सुरक्षित नसल्याने ते सामान्य नागरिकांची कशी व काय? सुरक्षा करतील असा सवाल तालुक्यातील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

याविषयी मिळालेल्या माहितीनुसार सोमवार रोजी सायंकाळच्या सुमारास बिडकीन पोलीस ठाण्यात संशयित आरोपी सोबत आलेल्या रजिया रियाज शेख रा.बिडकीन या महिलेने चक्क पोलीस ठाण्यात पिएसओ रूममध्ये कर्तव्यावर असलेल्या महीला पोलीस कर्मचारी समीना अहमद शेख यांच्याकडे जात विनाकारण हुज्जत घालत 'तू मला काय बोलली ?' असे म्हणून शिवीगाळ करत त्यांचे कपडे ओढत गालावर चापटी मारत या महिलेने पोलिस कर्मचाऱ्यास पोलीस ठाण्यातच ठार मारण्याची धमकी दिली असल्याच्या घटनेचा व्हिडीओ सोशल माध्यमावर व्हायरल झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली.या धक्कादायक घटनेची सर्वत्र चर्चा झाल्याने बिडकीन पोलीस ठाण्यात रजिया रियाज शेख या महीला विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम १३२, ११९(१), ११५(२), ३५१(३) अंतर्गत ४१७/२०२५ अंतर्गत गुन्हा दाखल करत तिला अटक केली आहे. सदर प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे हे करत आहेत.जर पोलीस ठाण्यात आणि ते ही कर्तव्यावर असलेल्या एका महिला कर्मचाऱ्यासोबत अशी घटना घडत असेल तर ही चिंताजनक बाब तर आहेच परंतु पोलिस ठाणे अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या हद्दीतील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येवून या परिसरातील नागरिकांमध्ये अशी चर्चा होत आहे की येथे पोलिसच सुरक्षित नसल्याने ते सामान्य नागरिकांची कशी व काय सुरक्षा करतील? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

